पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/१३/कावि/५१/२०१६
दिनांक -०५/०३/२०१६

परिपत्रक,

**विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहिती Social Media (Facebook,Twitter) वर post करणेसाठीचे माहितीबाबत....**

पिंपरी चिंचवड शहराचा केंद्रशासनाचे महत्वकांक्षी अमृत व स्वच्छ भारत अभियान या योजनेत समावेश झालेला आहे. सदर योजनेअंतर्गत नागरिकांचा सहभाग वाढविणेसाठी (Crowd Sourcing) व मोबाईल धारकांकडे तात्काळ माहिती उपलब्ध होणेसाठी Social Media (Facebook,Twitter) इ.चा प्रभावी वापर होणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध योजना, विविध प्रकल्पांचे उदघाटन, विभागांची विविध स्वरुपाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने सदर माहिती महापालिकेमार्फत वर्तमानपत्रात प्रसिध्द केली जाते तसेच सदरची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावरदेखील वेळोवेळी प्रसिध्द केली जाते. तथापि सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांद्वारे **Internet** व संगणक, लॅपटॉप, मोबाईल, टॅबलेट इत्यादी यंत्रणेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे व त्याद्वारे **social Media** चा वापर मोठ्याप्रमाणात होत असल्याचे दिसुन येत आहे. त्यादृष्टीने केंद्रशासन तसेच राज्य शासन व म.न.पा यांचेकडील विविध उपक्रम, योजना महापालिकेमार्फत राबविल्या जातात. त्याबाबतची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचण्याच्या दृष्टीने **Social Media** चा वापर महापालिकेमार्फत प्रभावीपणे करण्यात येत आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, वेळोवेळी आपले विभागामार्फत राबविणेत येणा-या योजना, उपक्रम, अभियान यांची माहिती **Social Media** द्वारे नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी सदरची माहिती soft copy द्वारे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे egov@pcmcindia.gov.in या ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी जेणेकरुन सदरची माहिती Social Media **वर post** करणे शक्य होईल व त्यानुसार नागरिकांना त्वरित माहिती प्राप्त होईल.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८